# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा

## सराव प्रश्नपत्रिका 4

## भाग एक * बुद्धिमत्ता चाचणी


### उमेदवारांसाठी सूचना

1. प्रश्नपत्रिकेच्या या भागात 50 प्रश्न आहेत.
2. संपूर्ण प्रश्नपत्रिका वाचत बसू नका. पहिल्या प्रश्नापासून प्रश्न सोडविण्यास सुरुवात करा. जर एखादा प्रश्न कठीण वाटला तर पुढचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करा. जर वेळ असेल तर कठीण प्रश्न तुम्ही नंतर सोडवू शकता.
3. हा भाग दहा विभागांत विभागलेला आहे. प्रत्येक विभागात 5 प्रश्नांचा समावेश आहे. प्रत्येक विभागातले प्रश्न एकाच स्वरूपाचे आहेत.

### विभाग - I


**सूचना : प्रश्न 1 ते 5 मध्ये चौरसाचा एक भाग रेषेच्या डाव्या बाजूला दिलेला आहे आणि दुसरा भा 1, 2, 3 आणि 4 या चार आकृत्यांमध्ये रेषेच्या उजव्या बाजूला दिलेला आहे. उजव्या बाजूमधील आकृत्यांमधू अशी आकृती शोधा की, ज्यामुळे चौरस पूर्ण होईल व त्या आकृतीखाली असणाऱ्या पर्यायाचा क्रमांक स्वतः उत्तरपत्रिकेत लिहा.**

प्रश्न 1 — प्रश्नआकृती | उत्तरआकृत्या




1 2 3 4

प्रश्न 2 — प्रश्नआकृती | उत्तरआकृत्या




1 2 3 4

प्रश्न 3 — प्रश्नआकृती | उत्तरआकृत्या




1 2 3 4

प्रश्न 4 — प्रश्नआकृती | उत्तरआकृत्या



1 2 3 4

प्रश्न 5 — प्रश्नआकृती | उत्तरआकृत्या



1 2 3 4


Scanned by CamScanner

## विभाग - II

**सूचना :** प्रश्न 6 ते 10 मध्ये रेषेच्या डाव्या बाजूला एक प्रश्नआकृती आहे. त्यातील थोडा भाग वगळला आहे. उजवीकडील उत्तराच्या आकृत्या 1, 2, 3 आणि 4 काळजीपूर्वक पाहा आणि उत्तराच्या आकृत्यांपैकी जी आकृती तिची दिशा न बदलता प्रश्नाकृतीच्या वगळलेल्या भागात बरोबर बसून त्यातील नक्षी पूर्ण करील, ती आकृती कोणती ती शोधून काढून तिच्या खालच्या पर्यायाचा क्रमांक स्वतंत्र उत्तरपत्रिकेत लिहा.

प्रश्न 6


प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या



1 2 3 4

प्रश्न 7


प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या



1 2 3 4

प्रश्न 8


प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या



1 2 3 4

प्रश्न 9


प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या



1 2 3 4

प्रश्न 10

प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या




1 2 3 4

## विभाग - III

**सूचना :** प्रश्न 11 ते 15 मध्ये तीन प्रश्नाकृत्या दिल्या असून चौथ्या आकृतीसाठी प्रश्नचिन्ह दिलेले आहे. पहिल्या दोन प्रश्नाकृत्यांमध्ये काही संबंध आहे. अशा प्रकारचा संबंध आकृती 3 व 4 मध्येही असायला पाहिजे. उत्तरआकृत्यांमधून एक अशी आकृती शोधा जी प्रश्नचिन्हाच्या जागी देता येईल. त्या आकृतीखालच्या पर्यायाचा क्रमांक स्वतंत्र उत्तरपत्रिकेत लिहा.

प्रश्न 11


प्रश्नआकृत्या — उत्तरआकृत्या



1 2 3 4

प्रश्नआकृत्या उत्तरआकृत्या


प्रश्न 12



1 2 3 4

प्रश्नआकृत्या उत्तरआकृत्या


प्रश्न 13



1 2 3 4

प्रश्नआकृत्या उत्तरआकृत्या


प्रश्न 14



1 2 3 4

प्रश्नआकृत्या उत्तरआकृत्या

प्रश्न 15




1 2 3 4

## विभाग - IV

**सूचना : प्रश्न 16 ते 20 मध्ये तीन प्रश्नआकृत्या दिलेल्या आहेत आणि चौथीची जागा मोकळी ठेवली आहे. प्रश्नआकृत्या मालिकेत आहेत. पुढे दिलेल्या उत्तराच्या आकृत्यांमधून अशी आकृती शोधून काढा की जी आकृतीमालिका पूर्ण करील. त्या आकृतीखालील पर्यायाचा क्रमांक उत्तरपत्रिकेत प्रश्नक्रमांकासमोरील चौकटीत लिहा.**

प्रश्नआकृत्या उत्तरआकृत्या

प्रश्न 16



1 2 3 4

प्रश्नआकृत्या उत्तरआकृत्या


प्रश्न 17



1 2 3 4

प्रश्नआकृत्या उत्तरआकृत्या

प्रश्न 18




1 2 3 4

Scanned by CamScanner

प्रश्नआकृत्या उत्तरआकृत्या


प्रश्न 19



1 2 3 4

प्रश्नआकृत्या उत्तरआकृत्या

प्रश्न 20




1 2 3 4

## विभाग - V

सूचना : प्रश्न 21 ते 25 मध्ये चौरसाचा एक भाग रेषेच्या डाव्या बाजूला दिलेला आहे आणि दुसरा भाग 1, 2, 3 आणि 4 या चार आकृत्यांमध्ये रेषेच्या उजव्या बाजूला दिलेला आहे. उजव्या बाजूमधील आकृत्यांमधून अशी आकृती शोधा की, ज्यामुळे चौरस पूर्ण होईल व त्या आकृतीखाली असणाऱ्या पर्यायाचा क्रमांक स्वतंत्र उत्तरपत्रिकेत लिहा.

प्रश्नआकृती उत्तरआकृत्या


प्रश्न 21



1 2 3 4

प्रश्नआकृती उत्तरआकृत्या


प्रश्न 22



1 2 3 4

प्रश्नआकृती उत्तरआकृत्या


प्रश्न 23



1 2 3 4

प्रश्नआकृती उत्तरआकृत्या


प्रश्न 24



1 2 3 4

प्रश्नआकृती उत्तरआकृत्या

प्रश्न 25




1 2 3 4

Scanned by CamScanner

## विभाग - VI


**सूचना : प्रश्न 26 ते 30 मध्ये प्रत्येक प्रश्नात 1, 2, 3 आणि 4 अशा आकृत्या दिलेल्या आहेत. यांपैकी तीन आकृत्या कोणत्यातरी बाबतीत समान असून एक आकृती निराळी आहे. जी आकृती निराळी आहे, ती ओळखून तिच्या खाली दिलेल्या पर्यायाचा क्रमांक स्वतंत्र उत्तरपत्रिकेत त्या प्रश्नक्रमांकासमोरील चौकटीत लिहा.**

**प्रश्न 26**




1 2 3 4

**प्रश्न 27**




1 2 3 4

**प्रश्न 28**




1 2 3 4

**प्रश्न 29**




1 2 3 4

**प्रश्न 30**




1 2 3 4

## विभाग - VII

**सूचना : प्रश्न 31 ते 35 मध्ये प्रत्येक प्रश्नात डावीकडे एक प्रश्नाकृती आणि उजवीकडे 1, 2, 3 आणि 4 अशा चार आकृत्या दिलेल्या आहेत. उजवीकडील अशा उत्तराकृतीला निवडा जो प्रश्नाकृतीचे प्रतिबिंब आहे जेव्हा आरसा *XY* ला ठेवला असेल. तुम्ही निवडलेल्या उत्तराकृतीचा क्रमांक प्रश्नाला जुळणाऱ्या क्रमांकासमोरील चौकटीत उत्तरपत्रिकेमध्ये इंग्लिश अंकात लिहा.**

प्रश्नआकृती उत्तरआकृत्या

**प्रश्न 31**





1 2 3 4

Scanned by CamScanner

**प्रश्न 32**


प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या




1 2 3 4

**प्रश्न 33**


प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या




1 2 3 4

**प्रश्न 34**

प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या




1 2 3 4

**प्रश्न 35**

प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या





1 2 3 4

## विभाग - VIII

**सूचना :** प्रश्न 36 ते 40 मध्ये कागदाच्या एका तुकड्याला दुमडून काही ठिकाणी ते पंच केले जाते, डावीकडील प्रश्नाकृतीमध्ये दाखविल्याप्रमाणे उजवीकडे चार उत्तराकृत्या 1, 2, 3 आणि 4 दिलेल्या आहेत. कागद उघडल्यावरच्या आकृतीप्रमाणे चार उत्तराकृतींमधील एक उत्तर निवडा आणि तुमचे उत्तर केवळ इंग्लिश अंकामध्ये (उदा.1, 2, 3, 4) प्रश्नाला जुळणाऱ्या क्रमांकासमोरील चौकटीत उत्तरपत्रिकेमध्ये लिहा.

**प्रश्न 36**


प्रश्नआकृत्या — उत्तरआकृत्या



1 2 3 4

**प्रश्न 37**


प्रश्नआकृत्या — उत्तरआकृत्या



1 2 3 4

**प्रश्न 38**

प्रश्नआकृत्या — उत्तरआकृत्या




1 2 3 4



Scanned by CamScanner


प्रश्नआकृत्या — उत्तरआकृत्या

प्रश्न 39



प्रश्नआकृत्या — उत्तरआकृत्या

प्रश्न 40




## विभाग - IX

सूचना : प्रश्न 41 ते 45 मध्ये डाव्या बाजूला एक प्रश्नाकृती असून उजव्या बाजूच्या 1, 2, 3 आणि 4 या उत्तराकृती दिलेल्या आहेत. प्रश्नाकृतीमध्ये दिलेले तुकडे जोडून उत्तर तयार करा. तुम्ही निवडलेल्या उत्तराकृतीच्या क्रमांकाने प्रश्नाला जुळणाऱ्या क्रमांकासमोरील चौकटीत उत्तरपत्रिकेत तुमचे उत्तर दाखवा.


प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या

प्रश्न 41




प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या

प्रश्न 42




प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या

प्रश्न 43




प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या

प्रश्न 44



प्रश्नआकृती — उत्तरआकृत्या

प्रश्न 45




Scanned by CamScanner

## विभाग - X


सूचना : प्रश्न 46 ते 50 मध्ये डाव्या बाजूला एक प्रश्नाकृती आहे आणि उजवीकडे चार उत्तराकृती 1, 2, 3 आणि 4 दिलेल्या आहेत. त्या उत्तराकृतीला शोधा ज्यात प्रश्नाकृती लपून/दडून बसलेली आहे. तुमचे उत्तर तुम्ही निवडलेल्या आकृतीच्या क्रमांकाने प्रश्नाला जुळणाऱ्या क्रमांकासमोरील चौकटीत उत्तरपत्रिकेमध्ये दाखवा.

**प्रश्न 46** प्रश्नआकृती | उत्तरआकृत्या




1 2 3 4

**प्रश्न 47** प्रश्नआकृती | उत्तरआकृत्या




1 2 3 4

**प्रश्न 48** प्रश्नआकृती | उत्तरआकृत्या




1 2 3 4

**प्रश्न 49** प्रश्नआकृती | उत्तरआकृत्या



1 2 3 4

**प्रश्न 50** प्रश्नआकृती | उत्तरआकृत्या



1 2 3 4

# भाग दोन ✳ अंकगणित

### उमेदवारांसाठी सूचना

1. या भागात 51 ते 75 या क्रमांकांचे एकूण 25 प्रश्न आहेत.
2. सुरुवातीला संपूर्ण प्रश्नपत्रिका वाचण्याची आवश्यकता नाही. पहिल्या प्रश्नापासून क्रमाने प्रश्न सोडविण्यास सुरुवात करा. जर एखादा प्रश्न कठीण वाटला तर पुढचा प्रश्न सोडवा आणि नंतर वेळ मिळाला तर राहिलेले प्रश्न सोडवा.
3. प्रत्येक प्रश्नासाठी 1, 2, 3, 4 अशी पर्यायी उत्तरे दिली आहेत. त्यापैकी फक्त एकच उत्तर बरोबर आहे. योग्य ते उत्तर निवडा आणि त्याच्या बाजूला असलेला पर्याय क्रमांक स्वतंत्र उत्तरपत्रिकेत लिहा.

Scanned by CamScanner

सूचना : प्रत्येक प्रश्नासाठी 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक असलेली संभाव्य उत्तरे दिलेली आहेत. त्यापैकी फक्त एकच उत्तर बरोबर आहे. तुम्हाला बरोबर उत्तर निवडायचे आहे आणि त्याच्या बाजूला असलेल्या पर्यायाचा क्रमांक उत्तरपत्रिकेत प्रश्नक्रमांकासमोरील चौकटीत लिहायचा आहे.

प्रश्न 51 : 18 आणि 24 यांच्या समाईक अवयवांची संख्या किती आहे?

1. 1    2. 8    3. 6    4. 4

प्रश्न 52 : खालीलपैकी कशाची किंमत 0.635 बरोबर आहे?

1. 6.35%    2. 63.5%    3. 635.0%    4. 6350%

प्रश्न 53 : एका चौरसाची परिमिती 144 मी आहे. त्याचे क्षेत्रफळ किती?

1. 12 चौ. मी.    2. 72 चौ. मी.    3. 1296 चौ. मी.    4. 1728 चौ. मी.

प्रश्न 54 : एका विद्यार्थ्याने पहिल्या चाचणीत 25 पैकी 18 गुण मिळवले आणि दुसऱ्या चाचणीत 25 पैकी 22 गुण मिळवले. तर दुसऱ्या चाचणीत त्याने किती शेकडा अधिक गुण मिळवले?

1. 4%    2. 8%    3. 16%    4. 20%

प्रश्न 55 : 250 नारिंगापैकी 50 नारिंगे एका वर्गात वाटली गेली. तर शेकडा किती नारिंगे शिल्लक राहिली?

1. 20%    2. 25%    3. 75%    4. 80%

प्रश्न 56 : एका व्यक्तीने डझनाला रु. 24 या दराने 2 डझन नारिंगे विकत घेतली आणि प्रत्येकी रु. 3 या दराने विकले. त्याला नफा किंवा तोटा किती झाला?

1. नफा रु. 12    2. तोटा रु. 12    3. नफा रु. 24    4. तोटा रु. 24

प्रश्न 57 : दरसाल 18 सरळव्याजाने रु.10000 गुंतवले, तर दर महिन्याला किती व्याज मिळेल?

1. रु. 100    2. रु. 120    3. रु. 150    4. रु. 180

प्रश्न 58 : पेनांची किंमत 15 पेन्सिलींच्या किमतीबरोबर आहे.तर 90 पेन्सिलींच्या बदल्यात किती पेन देता येतील?

1. 6 पेन    2. 18 पेन    3. 30 पेन    4. 75 पेन

प्रश्न 59 : $[(\frac{1}{2} \div \frac{2}{3}) + 1]$ या पदावलीची किंमत काय ?

1. $\frac{3}{10}$    2. $\frac{3}{5}$    3. $1\frac{1}{3}$    4. $1\frac{3}{4}$

प्रश्न 60 : 15, 20 आणि 30 यांचा ल.सा.वि. किती?

1. 2 x 2 x 3 x 5    2. 3 x 4 x 5 x 6

3. 4 x 3 x 5 x 2    4. 5 x 3 x 2

प्रश्न 61 : खालीलपैकी कोणती संख्या मूळ संख्या आहे?

1. 81    2. 83    3. 85    4. 87

प्रश्न 62 : 3082.53 मध्ये 8 ची स्थानिक किंमत किती आहे?

1. 80    2. 8    3. $\frac{8}{10}$    4. $\frac{8}{100}$

प्रश्न 63 : 143865 या संख्येला खालीलपैकी कशांनी पूर्ण भाग जातो?

1. 3, 4 आणि 8    2. 5, 2 आणि 9    3. 2, 3 आणि 5    4. 3, 5 आणि 9

प्रश्न 64 : दोन संख्याचे म.सा.वि. आणि ल.सा.वि. अनुक्रमे 4 आणि 48 आहेत. जर त्यातली एक संख्या 12 असेल तर दुसरी संख्या कोणती?

1. 16    2. 12    3. 8    4. 4

Scanned by CamScanner

**प्रश्न 65 :** राम रविवारी दु. नं. 9.30 वा. झोपला आणि दुसऱ्या दिवशी दु. पू. 5.50 वा. उठला. त्याच्या झोपेचा कालावधी किती झाला?

1. 8 तास 20 मिनिटे
2. 8 तास 10 मिनिटे
3. 7 तास 40 मिनिटे
4. 7 तास 20 मिनिटे

**प्रश्न 66 :** एक माणूस मोटरगाडीने 180 किमी अंतर 3 तासांत कापतो. त्याच वेगाने पुढचे 120 किमी अंतर कापायला त्याला आणखी किती वेळ लागेल?

1. $1\frac{1}{2}$ तास
2. 2 तास
3. $2\frac{1}{2}$ तास
4. $2\frac{3}{4}$ तास

**प्रश्न 67 :** खालीलपैकी कोणत्या संख्या उतरत्या क्रमाने आहेत?

1. 12.075, 12.705, 12.750
2. 12.750, 12.705, 12.075
3. 12.750, 12.075, 12.705
4. 12.075, 12.750, 12.705

**प्रश्न 68 :** खालीलपैकी कशाची किंमत 9 आहे?

1. 15 x 0.006
2. 15 x 0.060
3. 150 x 0.600
4. 15 x 0.600

**प्रश्न 69 :** $2 - 3 + 4 \times 3 \div 3 - 2$ या पदावलीची किंमत काय ?

1. 1
2. 2
3. 3
4. 4

**प्रश्न 70 :** 10, 19, 21, 22 आणि 28 या संख्याची सरासरी किती ?

1. 21
2. 20
3. 19
4. 18

**प्रश्न 71 :** सर्वांत मोठ्या चार अंकी संख्येतून सर्वांत मोठी तीन अंकी संख्या वजा केल्यास कोणती संख्या उरेल?


1. लहानात लहान तीन अंकी संख्या
2. लहानात लहान चार अंकी संख्या
3. मोठ्यात मोठी एक अंकी संख्या
4. लहानात लहान चार अंकी संख्येची नऊ पट

**प्रश्न 72 :** एका नकाशात 1 सेंमी = 18 किमी हे प्रमाण घेऊन अ व ब गाव 5.6 सेंमी अंतरावर दाखवले असल्यास अ व ब याच्यामधील अंतर किती असेल?

1. 100.8 सेंमी
2. 90.6 किमी
3. 100.8 किमी
4. 10 किमी

**प्रश्न 73 :** रामरावांकडे असणाऱ्या काही नोटांच्या संख्या स्तंभालेखात दाखवल्या आहेत. त्यावरून रामरावांकडे असणाऱ्या 5 रु. च्या नोटांची किंमत किती?

1. 625 रु.
2. 125 रु.
3. 750 रु.
4. 500 रु.




**प्रश्न 74 :** एका गावातील 6 मुलांपैकी 2 मुलांना पोहता येते, जर त्या गावात 450 मुले असतील; तर किती मुलांना पोहता येत नाही?

1. 300
2. 150
3. 250
4. 350

**प्रश्न 75 :** (16, 4, 2 ), (81, 9, 3 ), (?) यामध्ये प्रश्नचिन्हाच्या जागी कोणत्या संख्याचा समूह येईल?

1. (4, 2, 1)
2. (64, 16, 4)
3. (125, 25, 5)
4. (256, 16, 4 )

Scanned by CamScanner

# भाग तीन * भाषा

## उमेदवारांसाठी सूचना

1. भाषा या प्रश्नपत्रिकेत 76 ते 100 या क्रमांकांचे एकूण 25 प्रश्न आहेत.
2. सुरुवात करण्यापूर्वी संपूर्ण प्रश्नपत्रिका वाचून काढण्याची आवश्यकता नाही. पहिल्या प्रश्नापासून प्रश्न सोडविण्यास सुरुवात करा. जर एखादा प्रश्न कठीण वाटला तर पुढचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करा. जर वेळ असेल तर कठीण प्रश्न तुम्ही नंतर सोडवू शकता.
3. या प्रश्नपत्रिकेत पाच उतारे आहेत. प्रत्येक उताऱ्याच्या खाली पाच प्रश्न आहेत. उतारे काळजीपूर्वक वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.
4. प्रत्येक प्रश्नाला ठळकपणे 1, 2, 3 आणि 4 अशा अंकांत चार संभवनीय उत्तरे दिलेली आहेत. योग्य ते उत्तर निवडून उत्तराच्या बाजूला दिलेल्या पर्यायाचा क्रमांक स्वतंत्र उत्तरपत्रिकेत लिहा.

**सूचना : या भागात पाच उतारे आहेत. प्रत्येक उताऱ्याच्या शेवटी पाच प्रश्न आहेत. प्रत्येक उतारा काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या. प्रत्येक प्रश्नासाठी 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक असलेली संभाव्य उत्तरे दिलेली आहेत. त्यापैकी फक्त एकच उत्तर बरोबर आहे. तुम्हाला बरोबर उत्तर निवडायचे आहे आणि त्याच्या बाजूला असलेल्या पर्यायाचा क्रमांक स्वतंत्र उत्तरपत्रिकेत लिहा.**

### उतारा - 1

नागझिरा अरण्यात ७८ सालच्या मे महिन्यात मी महिनाभर तळ्याच्या काठी असलेल्या झोपडीत राहिलो आणि वानरांच्या टोळ्या पाहिल्या. रेखाटनं केली. नोंदी केल्या. त्यातूनच जे पुस्तक जन्माला आलं– ते नागझिरा. ह्या पुस्तकात वानरं म्हणून एक स्वतंत्र प्रकरण आहे. वानरांच्या दोन टोळ्या मला इथे बघायला मिळाल्या. ही माणसाच्या फार जवळची आहेत, असं वाटायला लावील, असंच वानरांचं सगळं वागणं होतं. नागझिराच्या निवांत मुक्कामात निरीक्षणाशिवाय मला दुसरा काही उद्योग नव्हता. वानरं पुष्कळ होती. बुजरी नव्हती. ह्या अरण्यात चितळं होती, रानडुकरं होती, गवे होते, रानकुत्री होती. ह्या सर्व प्राण्यांपेक्षा वानरं जास्त होती. ती सहज दृष्टीला पडत. एखादी टोळी हेरून तिचा दिवसभराचा दिनक्रमही पाहता येई. मी रानात केलेले निरीक्षण, इतर अभ्यासकांनी भारतात वेळोवेळी केलेल्या निरीक्षणांवर आधारित ग्रंथांच वाचन, कल्पकता यांचं मिश्रण होऊन त्यातून 'सत्तांतर' हे पुस्तक जन्माला आले.

**प्रश्न 76 :** या उताऱ्यातून किती पुस्तकांचा जन्म झाल्याचे सांगितले आहे?

**1.** एक **2.** दोन **3.** तीन **4.** एकही नाही

**प्रश्न 77 :** लेखकाने ही पुस्तके कोणत्या प्राण्याविषयी लिहिली आहेत?

**1.** गवे **2.** रानकुत्री **3.** वानरे **4.** चितळे

**प्रश्न 78 :** 'बुजरी' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?

**1.** लाजरी **2.** धीट **3.** शूर **4.** भांडखोर

**प्रश्न 79 :** 'दिनक्रम' या शब्दाचा अर्थ काय?

**1.** दिवसभराचा कार्यक्रम **2.** रात्रीचा कार्यक्रम

**3.** दिन आणि क्रम **4.** काहीही न कारणे

**प्रश्न 80 :** या उताऱ्यातून लेखकाला कोणत्या गोष्टीविषयी सांगायचे आहे?

**1.** कल्पकता व निर्मिती **2.** फिरणे **3.** निवांतपणे राहणे **4.** प्राण्यांना पाहणे

Scanned by CamScanner

## उतारा - 2

कोणती वनस्पती खावी आणि कोणती खाऊ नये, ही निवड सशाची किंवा हरणाची पोर आयांच्याकडून शिकतात. माणसांच्या पोरांच्या आया वाचनाच्या बाबतीत एवढ्या तत्पर असलेल्या मी पाहिल्या नाहीत. उद्योगपतींच्यापेक्षा देण्याच्या बाबतीत पुस्तके जास्ती उदार असतात. देण्याच्या कामी त्यांना हात आखडता येत नाहीत. पण जी छापली जातात व दोन पुठ्ठ्यांमध्ये बांधली जातात, ती सर्वच काही पुस्तकं म्हणायला लायक नसतात. त्यांचा 'अक्षरा'शी संबंधच नसतो.आपल्या अतिशय लुझ काळातही ज्यांची आठवण आपण विसरत नाही, अशी फारच थोडी असतात. दोन घटका मनोरंजन व्हावं किंवा वेळ ढकलला जावा ह्या हेतूने पुस्तके वाचण्याऐवजी आळशाचे वरदान अशी दिवसाची झोप काढलेलीच बरी नाही का? हलकी पुस्तकं तात्काळ ओळखता येतात, कारण ग्राहकांकडून उठाव व्हावा म्हणून नाना रंगीत आमिषांनी ती नटवलेली असतात. पांडित्याने भरलेल्या पुस्तकांपेक्षा प्रामाणिकपणे लिहिलेली चरित्रं, आत्मचरित्रं आपल्याला–बरंचसं शिकवतात. वयाच्या सुरुवातीच्या प्रहरात वाचलेल्या पुस्तकांमुळे काही वेळा जीवनाचा प्रवाह उंच प्रदेशाकडेसुध्दा वळवला जातो.

**प्रश्न 81 :** लेखकाच्या मते पुस्तके कोणापेक्षा अधिक उदार असतात?

1. उद्योगपती 2. आई 3. ग्रंथकार 4. ग्राहक

**प्रश्न 82 :** 'अक्षर' या शब्दाचा लेखकाला कोणता अर्थ अभिप्रेत आहे.

1. अ,क्ष, र –ही बाराखडी 2. टिकाऊ, नष्ट न होणारे 3. अक्षर –हे शीर्षक 4. छापील शब्द

**प्रश्न 83 :** पुस्तकांकडून कोणती अपेक्षा ठेवू नये, असे लेखक बजावितो?

1. वेळ काढणे, मनोरंजन करणे 2. आळशीपणा शिकवणे
3. पांडित्य दाखविणे 4. खात राहणे

**प्रश्न 84 :** 'वरदान' या शब्दाचा अर्थ काय?

1. निरुपयोगी 2. आशीर्वाद 3. अक्षर 4. शहाणपण

**प्रश्न 85 :** 'प्रामाणिक' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता?

1. अप्रामाणिक 2. खोटा 3. स्वार्थी 4. उदार

## उतारा - 3

खरेच, कशातून आपण काहीही पाहू शकतो. आंघोळीच्या बादलीभर पाण्यात गंगा, सिंधू, सरस्वती, यमुना अशा प्रचंड नद्या आपल्या घरी येतात. आपल्याला न्हाऊ घालतात. नारळ, सुपारी, चार तांबड्या अक्षता, चार फुले, एखादे तुळशीपत्र, बिल्वपत्र आपल्याला पुरेसे होते, त्यातून आपल्याला पुष्कळसे काही दिसू शकते. मोठ्या प्रतिभासंपन्न लेखकांच्या बाबतीत हेच घडत असावे. एखाद्या घटनेच्या झरोक्यातून ते एखादा अनुभव घेतात आणि मग त्या अनुभवावर आपल्या प्रतिभेची विशिष्ट किमया ते करतात. जन्म, मृत्यू, प्रेम, वात्सल्य, विरक्ती या भावना सनातनच आहेत. पण प्रतिभावंत ज्यावेळी त्या अनुभवांचे, भावनांचे चित्रण करतात, त्यावेळी त्यांना पलीकडचे एक जग दिसत असते. हे जग खास त्यांचे असते. कलांवत हा प्रतिसृष्टी निर्माण करतो असे म्हणतात ते याच अर्थाने म्हटले जात असावे. प्रतिभावंताच्या अनुभवाच्या खिडकीतून आपण पलीकडे जाऊ शकतो. त्याच्या स्वतःच्या जगात आपण प्रवेश करू शकतो. त्या वातावरणात मुक्तपणे वावरतो.

**प्रश्न 86 :** या उताऱ्यातून कोणती कल्पना व्यक्ती झाली आहे?

1. आपण काहीही बघू शकतो. 2. प्रतिभावंताचे विश्व प्रतिभेतून निर्माण झालेले असते
3. माणूस श्रद्धावान असतो. 4. खिडकीतून डोकावून पाहणे.

**प्रश्न 87 :** 'प्रेम' या शब्दाचे विरुद्धार्थी रूप कोणते?

1. द्वेष 2. लोभ 3. माया कठोर 4. राग

Scanned by CamScanner

**प्रश्न 88 :** वरील उताऱ्यात किती नद्यांचा उल्लेख झाला आहे?

1. सहा 2. तीन 3. एक 4. चार

**प्रश्न 89 :** 'वात्सल्य' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?

1. माया 2. पवित्र 3. पावन 4. मंगल

**प्रश्न 90 :** लेखकाच्या अनुभवांनी वाचक काय करु शकतो?

1. तो स्वतःच्या जगात प्रवेश करु शकतो. 2. तो आनंदाने वेडा होतो.
3. त्याला झोप येऊ लागते. 4. तो पुस्तक मिटून ठेवतो.

## उतारा - 4

नवरत्न सुपर मार्केटमध्ये गेलेल्या कुणाचीही केवळ एक मोठी महत्त्वाकांक्षा असायची : खरेदीकरिता पैसे खर्च करावे न लागणारा भाग्यवान बनणे. कारण हेच तर अगदी प्रवेशद्वाराच्या आतल्या बाजूस असलेल्या सूचनेने आश्वासन दिलेले होते. त्यात म्हटले होते लक्षात ठेवा, आठवड्यातून एकदा, आमच्या ग्राहकांपैकी एकाला फुकट माल मिळेल. हा तुमचा भाग्यशाली दिवस असू शकेल ! सौ. देव यांनी अनेक आठवडे आपल्या नशिबाची परीक्षा पाहिली. त्यांचे घर बिनगरजेच्या वस्तूंनी भरून गेले पण त्यांनी आशा सोडली नाही. एका शनिवारच्या सकाळी सौ. देव यांनी आपली खरेदी संपवली आणि त्या सुपर मार्केटमधून निघाल्या. तेव्हाच नेमके त्यांच्या लक्षात आले की, त्या चहा खरेदी करायचे विसरून गेल्या होत्या. त्या परत फिरल्या, त्यांनी चहा खरेदी केला आणि पैसे भरण्याच्या टेबलाकडे त्या गेल्या. व्यवस्थापक त्यांच्याजवळ आला आणि म्हणाला, "बाईसाहेब, मला तुमचे अभिनंदन करायचे आहे ! आपण आज आमच्या भाग्यशाली ग्राहक आहात आणि तुमच्या पिशवीत जे काही आहे ते फुकट आहे."

**प्रश्न 91 :** व्यवस्थापकाने सौ. देव यांचे अभिनंदन केले, कारण

1. त्यांच्याजवळ पैशांनी भरलेली पिशवी होती.
2. त्या त्यांच्या भाग्यशाली ग्राहक बनल्या होत्या.
3. त्या वारंवार सुपर मार्केटमध्ये जात.
4. त्यांनी लॉटरी जिंकली होती.

**प्रश्न 92 :** व्यवस्थापकाने ती चांगली बातमी सांगितल्यावर सौ. देव यांची काय प्रतिक्रिया झाली असेल ?

1. आनंदी 2. रोमांचित 3. नाराज 4. उदासीन

**प्रश्न 93 :** प्रत्येक जण नवरत्न सुपर मार्केटकडे आकृष्ट होत होता, कारण

1. आठवड्यातून एकदा तिथे वस्तू स्वस्त मिळत.
2. महिन्यातून एकदा तिथे ग्राहकांना फुकट माल मिळत असे.
3. आठवड्यातून एकदा तिथे एका ग्राहकाला फुकट माल मिळायचा.
4. आठवड्यातून एकदा तिथे दोन ग्राहकांना फुकट माल मिळे.

**प्रश्न 94 :** सौ. देव यांचे घर बिनगरजेच्या वस्तूंनी भरून गेले होते, कारण

1. त्यांना खरेदी करायला आवडायचे. 2. आपण भाग्यशाली विजेती ठरू अशी त्यांना आशा वाटायची.
3. त्यांनी आशा सोडून दिली. 4. त्यांनी खरेदी संपवली आणि त्या सुपर मार्केटमधून निघाल्या.

**प्रश्न 95 :** सौ. देव सुपर मार्केटमध्ये का परतल्या ?

1. त्यांची खरेदी संपली नव्हती. 2. त्या आपली पिशवी विसरल्या होत्या.
3. त्यांनी चहा खरेदी केला नव्हता. 4. त्या साखर खरेदी करायला विसरल्या.

## उतारा - 5

सर्व सजीवांना टिकून राहण्यासाठी अन्न आणि धोक्यापासून सुरक्षितता यांची आवश्यकता असते. त्यांनी टिकून

Scanned by CamScanner

राहण्यासाठी अन्न मिळवलेच पाहिजे. काही वेळा इतरांबरोबर अन्न वाटून घेण्याचे टाळण्यासाठी ते कुठल्याही थरापर्यंत जातात. तथापि, काही प्राणी आपल्या अन्नाच्या शोधात इतरांशी संपर्क साधून सहकार्य करतात. अन्नाच्या स्थळ निश्चितीची माहिती एकमेकांना देण्याच्या बाबतीत मधमाश्यांनी एक अतिशय समृद्ध व्यवस्था विकसित केलेली आहे. पोळ्यामध्ये मधमाश्या एक प्रकारचे नृत्य करतात. त्या नृत्यात विशिष्ट दिशेने हालचाली करीत त्या आपली शरीरे मुरडतात. या नृत्याच्या माध्यमातून त्या इतर मधमाश्यांना सूचित करू शकतात की सूर्याच्या अमुक दिशेला मधाने भरलेली फुले विपुल प्रमाणात आहेत. हा पुरवठा किती दूर अंतरावर आहे हे देखील त्यांच्या हालचालींतून सूचित होते. बरेचसे प्राणी विशिष्ट प्रकारचा आवाज काढून टोळीतील इतर सदस्यांना इशारा देतात की जवळपास धोका आहे. काही पक्षी खूप मोठे इशाऱ्याचे ध्वनी निर्माण करतात. काही प्राणी इतर प्राण्यांनी दिलेल्या इशाऱ्यांकडे ध्यान देतात, तर काही प्राणी राखणदार नेमतात, जेणेकरून इतरांना सुरक्षितपणे खातापिता येते.

**प्रश्न 96** : सर्व सजीवांना टिकून राहण्यासाठी आवश्यक असणाऱ्या दोन गोष्टी आहेत.

1. अन्न आणि निवारा
2. अन्न आणि सुरक्षितता
3. अन्न आणि मित्र
4. सूर्य आणि मध

**प्रश्न 97** : 'मुरडणे' या शब्दाचा अर्थ आहे -

1. प्रदक्षिणा घालणे
2. शरीराची विविध दिशांना हालचाल करणे
3. अंगाचे मुटकुळे करणे
4. गुंजारव करण्यासाठी पंख फडफडवणे

**प्रश्न 98** : प्राणी आपले अन्न इतरांशी वाटून खाण्याचे टाळतात, कारण ..

1. त्यांना खाऊन झाल्याबरोबर झोपायला शांत जागा हवी असते.
2. ते सामान्यत: उघड्यावर खात नाहीत.
3. आपल्या स्वतःच्या टोळींकडून अथवा इतर प्राण्यांकडून हल्ला होण्याची त्यांना भीती वाटते.
4. त्यांना सुरक्षित जागी अन्न लपवून ठेवायचे असते.

**प्रश्न 99** : मधमाश्या आपल्या नृत्यातून आपल्या जथ्याला कोणती माहिती पुरवतात ?

1. पोळ्याला असलेल्या धोक्याविषयी
2. आपल्या जथ्याच्या अंतर्गत धोक्याविषयी
3. अन्नाची उपलब्धी, अंतर आणि दिशा यांविषयी
4. अन्नाच्या उपलब्धीच्या दिशेविषयी

**प्रश्न 100** : पुढीलपैकी कोणता पदबंध 'विकसित केलेली आहे' या पदबंधास जवळचा आहे ?

1. बनली आहे.
2. घेतली आहे.
3. नृत्य केले आहे.
4. उद्भूत केली आहे.

Scanned by CamScanner